**-: प्रेसनोट दिनांक - १२/०७/२०२३ :-**

**आरोपी १) सर्जेराव शामराव घोसरवाडे , वय - ४१ वर्षे, तलाठी, सजा - साजणी आणि तिळवणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, सद्या रा. प्लॅट नं.१०८, स्वप्नपुर्ती अपार्टमेंन्ट, पुईखडी, नविन वाशीनाका जवळ, कोल्हापूर मुळ रा. कांडगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर २) साहील यासीन फरास, वय - २३ वर्षे, (खाजगी उमेदवार) रा. तिरंगा चौक, साजणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून ती लाच रक्कम स्विकारलेबाबत.....**

---

तक्रारदार यांनी तिळवणी येथे गट नं.१८८ मधील एकुण क्षेत्रापैकी २१ आर इतके क्षेत्र जमीन खेरेदी दस्ताने रजिस्टर खरेदी केली आहे. सदर खरेदी दस्ताची नोंद फेरफार मध्ये करणे कामी तसेच त्यांचे वडीलांचे नावे तिळवणी येथील गट नं.१८५ वर बॅकेचे कर्ज घेतले असुन त्याचा तारण दस्त रजिस्टर असुन बॅकेचा बोजा नोंद फेरफार मध्ये करणेचा आहे. त्यासाठी तक्रारदार यांनी तलाठी घोसरवाडे यांचेकडे आवश्यक ती कागदपत्रे दिलेली होती. तक्रारदार यांनी तलाठी घोसरवाडे यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांचे दोन्ही दस्त फेरफार मध्ये नोंद करणेकामी तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन पैशाची मागणी केली.

दिनांक १२/०७/२०२३ रोजी तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार अर्ज दिला. तक्रारीप्रमाणे दिनांक १२/०७/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी नंबर १ **सर्जेराव शामराव घोसरवाडे** याने तक्रारदार यांचेकडे सातबारा पत्रकी नोंद करणेकामी २०,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन खाजगी उमेदवार आरोपी नंबर २ **साहील यासीन फरास** यांनी आरोपी नंबर ०१ घोसरवाडे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांचे सांगणेवरून तक्रारदार यांचेकडे मागणी करून मागणी केलेली लाच रक्कम २००००/- रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत **१) सर्जेराव शामराव घोसरवाडे , वय - ४१ वर्षे, तलाठी, सजा - साजणी - तिळवणी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, सद्या रा. प्लॅट नं.१०८, स्वप्नपुर्ती अपार्टमेंन्ट, पुईखडी, नविन वाशीनाका जवळ, कोल्हापूर मुळ रा. कांडगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर २) साहील यासीन फरास, वय - २३ वर्षे, खाजगी उमेदवार, , रा. तिरंगा चौक, साजणी, ता. हातकांगले, जि. कोल्हापूर** यांचेविरूध्द हातकणंगले पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची कारवाई सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोलीस उप निरीक्षक संजीव बंबरगेकर, पो.हे.कॉ. विकास माने, पो.हे.कॉ. सुनिल घोसाळकर, पो.कॉ. रूपेश माने, पोकॉ उदय पाटील, चा.पो.हे.कॉ.सुरज अपराध अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

Scanned with CamScanner